प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

मार्च 1, 2017

**राजसमंद नागरी सहकारी बँक लि., राजसमंद ह्यांचेवर आरबीआयकडून दंड लागु**

बँकिंग विनियामक अधिनियम, 1949 च्या (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) कलम 46(4) सह वाचित, कलम 47अ(1)(क) च्या तरतुदींखाली तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व बँकेने, राजसमंद नागरी सहकारी बँक लि., राजसमंद ह्यांना रु.5.00 लाख (रु. पाच लाख) दंड लावला आहे. हा दंड आरबीआयने पुढील बाबतीत दिलेल्या सूचना/मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन केल्याबाबत लावला आहे. (1) कर्जाशी शेअर भांडवलाची जोडणी (2) विहित केलेल्या व्यक्तिगत कर्ज-एक्सपोझर-मर्यादांचा भंग (3) वरील बँकेने विहित केलेल्या मर्यादे पलिकडे अप्रतिभूतित कर्जे दिली आणि एका सीसी खात्यात विहित मर्यादे पलिकडे वारंवार ओडी देऊ केला. (4) नॉन-बँकिंग ॲसेट्स मिळविणे.

वरील बँकेच्या तपासणीमधून मिळालेल्या बाबींवर आधारित, रिझर्व बँकेने, वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस पाठविली होती. त्यावर त्या बँकेने लेखी उत्तर सादर केले होते आणि आरबीआयच्या कार्यकारी संचालकांसमोर व्यक्तीगत सुनावणीही केली होती. ह्या प्रकरणातील सत्य व बँकेने दिलेले उत्तर विचारात घेतल्यावर, वरील उल्लंघने झाली असून त्याबाबत दंड लावणे आवश्यक आहे असा निष्कर्ष रिझर्व बँकेने काढला.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2016-2017/2328**